e Paper

आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्षे 4थे

www.metrocityvrutant.in | मंगळवार दिनांक 16/12/2025 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 07 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# महापालिका निवडणूक जाहीर

## मतदान 15 जानेवारीला तर निकाल 16 जानेवारी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई-ठाण्यासह राज्यातील प्रलंबित 29 महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या महापालिकांसाठी 15 जानेवारी रोजी मतदान होणार असून त्याचा निकाल 16 जानेवारी रोजी लागणार आहे. त्यासाठी सोमवार पासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली.**




ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुका या गेल्या पाच ते सात वर्षांपासून किंवा त्या पेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. त्यामध्ये सुरुवातीला 2 डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यात आल्या. आता त्यानंतर राज्यातील प्रलंबित 29 महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.

**मतदानाची तारीख - 15 जानेवारी**

**मतदानाचा निकाल - 16 जानेवारी**

27 महापालिकांची मुदत संपली आहे. त्यासोबत जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या महापालिका निवडणुकांसाठी 1 जुलै 2025 रोजीची मतदान यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आली असल्याने त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य आयोगाला नाहीत असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

एकूण मतदार - 3.48 कोटी

एकूण मतदार केंद्र - 39,147

मुंबईसाठी मतदार केंद्र - 10,111

कंट्रोल यूनिट - 11,349

बॅलेट यूनिट - 22,000

मुंबई महापालिकेमध्ये एक सदस्यीय वॉर्ड असल्यामुळे मतदारांना एकच मत द्यावं लागणार आहे. तर उर्वरित 28 महापालिकांसाठी एक ते पाच सदस्यीय वॉर्ड असल्याने त्यानुसार मतदान द्यावं लागणार आहे. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज फक्त ऑफलाईन पद्धतीने करता येणार आहे. तसेच ज्या उमेदवारांकडे सध्या जात वैधता प्रमाणपत्र नाही त्यांना निवडणुकीपासून सहा महिन्यांच्या आत सादर करावं लागणार आहे.निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांची ठिकाणे देखील निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, प्राधिकरण, निगडी, पुणे येथे प्रभाग क्रमांक १०, १४, १५ व १९ करिता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्थापित करण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ करिता ब क्षेत्रीय कार्यालय, लिंक रोड, एल्प्रो मॉलच्या मागे, चिंचवडगाव येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय असणार आहे. प्रभाग क्रमांक २, ६, ८ व ९ करिता क क्षेत्रीय कार्यालय, पॉलिग्रास हॉकी स्टेडियमजवळ, एमआयडीसी, भोसरी येथे तर प्रभाग क्रमांक २५, २६, २८ व २९ करिता ड क्षेत्रीय कार्यालय, औंध-रावेत बीआरटी रोड, रहाटणे येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय असणार आहे. प्रभाग क्रमांक ३, ४, ५ व ७ करिता कबड्डी प्रशिक्षण संकुल, अंकुशराव लांडगे नाट्यगृहाच्या मागे, भोसरी येथे तर प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ करिता सेक्टर १७/१९, स्पाईन रोड शेजारी, घरकुल चिखली टाउन हॉल येथे व प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ साठी ग क्षेत्रीय कार्यालय, वेंगसरकर अकादमीच्या मागे, थेरगाव येथे आणि प्रभाग क्रमांक २०, ३०, ३१ व ३२ करिता पिंपरी चिंचवड बॅडमिंटन हॉल, पी.डब्ल्यू.डी. मैदान, सांगवी येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्थापित करण्यात आले आहे.महापालिका सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले आहे. आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे, याकरिता महापालिकेसह सर्व प्रशासकीय यंत्रणांना आदेश देण्यात आले आहेत. मतदान जनजागृती कार्यक्रम देखील महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात आला असून सर्व पात्र मतदारांनी प्रत्यक्ष मतदान करावे, याकरिता जास्तीतजास्त प्रयत्न करण्यासाठी स्वीप मोहीम व्यापक करण्यात आली आहे.

# उपेक्षित समाजाला न्याय मिळेपर्यंत लढणार - आ. अमित गोरखे

## आ. गोरखे यांची तालिका सभापतीपदी पुनर्नियुक्ती आणि सर्वाधिक प्रश्न विचारणारा आमदार अशी ओळख

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - प्रतापगड किल्ल्याचे संवर्धन, ग्रामीण भागातील अनुसूचित समाजाच्या स्मशान भूमीचा प्रश्न, औद्योगिक व वाणिज्य वापर असणाऱ्या वीज ग्राहकांवरील अन्यायकारक वीज दरवाढ, रेबीज प्रतिबंधक लस तुटवडा, पुणे शहरात वाढणारी अंमली पदार्थांची तस्करी, पिंपरी चिंचवड शहरातील मोबाईलचे अनधिकृत टॉवर्स आणि मिळकत कर मुद्दा, मुळा - मुठा नदी पाणलोट क्षेत्रातील नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण व संवर्धन, पिंपरी चिंचवड सह इतर शहरी भागातील वाहतूक व पर्यावरण प्रश्न, सार्वजनिक आरोग्य, होमिओपॅथी डॉक्टरांच्या नोंदणी प्रक्रियेतील विलंब, पालघर जिल्ह्यातील अवैध दगड खाणी व ब्लास्टिंग मुळे निर्माण झालेला धोका आणि एस. सी. आरक्षणात अ, ब, क, ड उपवर्गीकरण आरक्षण साठी न्यायाधीश बदर समितीचा अहवाल सादर करून निर्णय घ्यावा तसेच हे उपवर्गीकरण जाहीर होईपर्यंत राज्यातील सर्व मेगाभरती स्थगित करावी अशा विविध मुद्द्यांवर नागपूर येथे संपन्न झालेल्या हिवाळी अधिवेशनात मला प्रश्न मांडण्याची संधी मिळाली अशी माहिती आमदार अमित गोरखे यांनी दिली.**




सोमवारी, पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भाजपा शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सदाशिव खाडे, दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिल्ले, माजी नगरसेवक शीतल शिंदे, राजू दुर्गे, ॲड. मोरेश्वर शेडगे, संदीप वाघेरे, शैलेश मोरे, किरण मोटे, सुप्रिया चांदगुडे, मंडळ अध्यक्ष धरम वाघमारे, अनिता वाळुंजकर, मंगेश धाडगे, नेताजी शिंदे, ॲड. नानिक पंजाबी आदी उपस्थित होते

आ. गोरखे यांनी सांगितले की, पुणे शहरात अंमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचा प्रश्न मी आकडेवारी सह उपस्थित केला होता.

या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती देताना सांगितले की, याविषयी जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १८९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २८७ आरोपी अटकेत असून त्यांच्याकडून ५.५५ कोटींचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. इतर प्रश्नांबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले की, सर्व विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर मांडून लवकरच निर्णय घेण्यात येईल.

पुणे जिल्ह्यातील भोर उपजिल्हा रुग्णालय व मुळशी भागात अँटी रेबीज लसीची कमतरता आहे. जिल्हा परिषदेत शाळांमध्ये प्रशासकीय ताणतणावामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांचे नुकसान होत आहे. येथील अवैध दगड खाणी व ब्लास्टिंग मुळे धरणे घरे व शेतीला धोका निर्माण झाला आहे. तसेच पालघर जिल्ह्यातील प्रस्तावित मोरबे बंदराला स्थानिक ग्रामस्थ व मच्छीमारांचा विरोध आहे या विषयाकडे देखील सभागृहाचे लक्ष वेधले.

प्रतापगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी ठोस उपाययोजना करावी अशी मागणी सभागृहात केली असता "प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरण" स्थापन करण्यात आले असून त्यासाठी १२७.५५ कोटी रुपयांचा निधी देखील मंजूर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली, येथे शिवसृष्टी उभारण्यात येणार आहे.

राज्यातील औद्योगिक व वाणिज्य वापर करणाऱ्या वीज ग्राहकांवरील वीज दरवाढ अन्यायकारक आहे. प्रतिजैविक औषधांच्या अनियंत्रित वापरामुळे सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाय योजनांचे समर्थन केले. वडगाव, आंबोडी बाजारातील परप्रांतीय विक्रेत्यांच्या आधार कार्ड तपासणीमुळे अफवांना पूर्णविराम मिळाला आहे. तसेच राज्यातील ग्रामीण भागात अद्यापही अनुसूचित समाजाच्या नागरिकांचा स्मशान भूमीचा प्रश्न सुटला नसून याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा अशी मागणी केली.

पुणे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उप केंद्रात रेबीज प्रतिबंधात्मक लस आणि जीवनसत्वाच्या गोळ्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे.

या विषयावर लक्षवेधी मांडली असता मंत्री आबिटकर यांनी उत्तर दिले की, स्थानिक पातळीवर तुटवडा निर्माण झाला असल्यास संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना स्थानिक निधीतून तातडीची खरेदी करण्याचे अधिकार देण्यात येतील, अशी माहिती आमदार अमित गोरखे यांनी यावेळी दिली.

# मोकाट श्वानांना अन्न देणाऱ्या नागरिकांना अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी – शहरातील जे नागरिक व प्राणीप्रेमी मोकाट श्वानांना नियमितपणे अन्न खाऊ घालतात, त्यांनी त्याबाबतचा अर्ज महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे सादर करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**



नागरिकांनी अर्ज सादर करताना त्या अर्जामध्ये श्वानांना अन्न खाऊ घालण्यात येणाऱ्या ठिकाणाची अचूक माहिती, अन्न देण्याची वेळ, त्या ठिकाणी असलेल्या मोकाट श्वानांची अंदाजे संख्या तसेच संबंधित अन्य आवश्यक तपशील नमूद करणे बंधनकारक असणार आहे.अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर २०२५ असून नागरिकांनी पशुवैद्यकीय विभागात प्रत्यक्षरित्या अर्ज सादर करावेत. प्राप्त अर्जांच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून श्वानांना अन्न खाऊ घालण्यासाठी योग्य ठिकाणे निश्चित करण्यात येणार आहेत.अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे, अशी माहिती पशुवैद्यकीय विभागाचे उप आयुक्त संदीप खोत यांनी दिली आहे.

# स्थायी समिती सभेत विविध विकासकामांच्या खर्चास मान्यता



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापालिका तसेच स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक श्रावण हर्डीकर दूरस्थ (ऑनलाईन)पद्धतीने उपस्थित होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली.**

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, विजयकुमार खोराटे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.स्थायी समिती सभेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात नाट्य प्रशिक्षण उपक्रम राबविणे, इ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. ५ गवळीनगर व इतर परिसरातील सेवा वाहिन्या टाकलेल्या ठिकाणचे रस्ते पेव्हिंग ब्लॉक टाकून सुधारणा करणे व अनुषंगिक कामे करणे, येथील रस्त्यांची एम. पी. एम. व हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करणे आणि इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासक हर्डीकर यांनी मान्यता दिली. तर प्रभाग क्र. ३ चऱ्होली, प्रभाग क्र. ४ बोपखेल, प्रभाग क्र. ५, प्रभाग क्र. ७ परिसरातील विविध ठिकाणची स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे व प्रभागातील अनुषंगिक कामे करणे तसेच प्रभाग क्र. ५ मधील डांबरी रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत मामुर्डी सर्वे नं. ४ मधील आ. क्र. ४/१६४ खेळाचे मैदान येथे सीमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ९ मधील महापालिकेच्या विविध कार्यक्रमांकरिता मंडप व्यवस्था करणे तसेच प्रभाग क्र. २ जाधववाडी येथील कचरा संकलन केंद्र व परिसरातील डांबरीकरण व प्रभाग क्र. २ मधील चिखली कुदळवाडी येथील परिसरात स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली. तर महापालिकेच्या आरोग्य विभागासाठी डिओडरंट कम डिसइन्फेक्टंट खरेदी करणे, स्थायी समिती सभागृह येथे व्हिडीओ स्प्लिटर बसविणे या विषयांना देखील मान्यता देण्यात आली.याव्यतिरिक्त, इ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ५ मधील गणेश कॉलनी व इतर परिसरातील व प्रभाग क्र. ३ मोशी येथील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक काम करण्यासाठी येणाऱ्या खर्चास स्थायी समिती सभेत मान्यता देण्यात आली. याशिवाय, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ४ दिघी परिसरात विविध ठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्ती विषयक कामे करणे, ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २ चिखली येथील रस्त्याचे एम. पी. एम. पद्धतीने डांबरीकरण करणे तसेच प्रभाग क्र. २ मोशीमधील परिसरात महापालिका इमारतींची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच ब क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. २२ काळेवाडी येथील विविध ठिकाणी स्टॉर्म वॉटर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २ मोशी परिसरात एम. पी. एम. पद्धतीने रस्त्यांचे डांबरीकरण करणे व महापालिका शाळा, दवाखाना यांची देखभाल-दुरुस्तीची स्थापत्य विषयक कामे करणे यासह विविध विषयांना येणाऱ्या खर्चास आयुक्त हर्डीकर यांनी यावेळी मंजुरी दिली.

# राजगुरुनगरमध्ये विद्यार्थ्याचा गळा चिरून खून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : वादातून मित्राने खासगी शिकवणी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा चाकूने गळा चिरून खून केल्याची धक्कादायक घटना राजगुरुनगर भागात सोमवारी सकाळी घडली. शिकवणी वर्गातील शिक्षक आणि विद्यार्थ्यासमोरची ही खळबळजनक घटना घडली.गंभीर जखमी झालेल्या विद्यार्थ्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आल्यानंतर राजगुरुनगर परिसरात शोककळा पसरली. याप्रकरणी पोलिसांनी विद्यार्थ्याचा खून करणाऱ्या मित्राला ताब्यात घेतले आहे. याबाबत शिकवणी वर्गातील शिक्षिकेने खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पुष्कर दिलीप शिंगाडे (वय १६) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी मित्राला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुष्कर हा राजगुरूनगरमधील एका शाळेत शिक्षण घेत आहे. तीन महिन्यांपूर्वी पुष्करचा वर्गात एका मित्राबरोबर किरकोळ वाद झाला होता. दोघेही एका शिकवणी वर्गात एकत्र शिकत होते.सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे पुष्कर आणि त्याचा मित्र शिकवणीला गेले. वर्गात शिक्षक, तसेच अन्य विद्यार्थी होते. शिक्षक फळ्यावर शिकवत होते. तेवढ्यात पुष्करच्या शेजारी बसलेल्या मित्राने दफ्तरातून चाकू काढला आणि त्याच्यावर हल्ला चढविला. पुष्करचा गळा आणि पोटावर चाकूने वार केले. शिकवणी वर्गात पुष्कर रक्ताच्या थारोळ्यात कोसळला.

हा प्रकार पाहून शिक्षकांसह विद्यार्थ्यांचा थरकाप उडाला. विद्याथी भयभीत झाले. गंभीर जखमी झालेल्या पुष्करला तातडीने खासगी रुग्णलयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चव्हाण तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
आधुनिक शहरातील घडामोडी
मंगळवार दिनांक 16/12/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# किवळे येथील 755 सदनिकांची संगणकीय सोडत जाहीर

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे, त्यांना चांगले घर मिळावे तसेच झोपडपट्टी विरहित शहर असावे, यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्यातून शहरातील प्रत्येक गरजू व बेघरांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका अग्रेसर आहे. आज प्रधानमंत्री आवास योजनेतील डूडूळगाव येथील व आर्थिक दुर्बल घटकांच्या किवळे प्रकल्पांतील सदनिकांची संगणकीय सोडत काढण्यात आली आहे.**



या सोडतीमध्ये निवड झालेल्या नागरिकांचे शहरातील स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत डूडूळगाव येथे उभारलेल्या प्रकल्पातील १ हजार १९० सदनिका तसेच किवळे येथील आर्थिक दुर्बल घटकांच्या ७५५ सदनिकांचे पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते संगणकीय सोडत झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते सोडतीमध्ये विजेत्या सदनिका लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात पत्रांचे वाटप करण्यात आले.यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, सीओईपीचे विभागप्रमुख डॉ. सुधीर आगासे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, माजी नगर सदस्य सागर आंघोळकर, सहाय्यक आयुक्त डी. डी. कांबळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आमदार जगताप पुढे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहर हे देशात सातव्या व राज्यात पहिल्या क्रमांकाचे राहण्यायोग्य शहर म्हणून नावारूपास आले आहे. या शहरात आपले स्वतःचे हक्काचे घर असावे, असे स्वप्न प्रत्येकाचे असते. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून पिंपरी चिंचवड महापालिका नागरिकांचे हे स्वप्न पूर्ण करीत आहे. सदर सोडत पारदर्शक पद्धतीने करण्यात आली आहे. आजच्या सोडतीत घर न मिळाल्यास नागरिकांनी निराश होऊ नये. तर त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना २.० साठी अर्ज करावा, असे आवाहन देखील त्यांनी केले.अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी प्रास्ताविक केले. तर उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सदर योजनेबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार उपायुक्त बोदडे यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी मिळवला अबू धाबी येथे लर्निंग जर्नल पुरस्कार

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी - युनायटेड अरब अमिरात मधील अबुधाबी येथे झालेल्या "रोबो कप एशिया पॅसिफिक २०२५" या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वोत्कृष्ट लर्निंग जर्नल पुरस्कार मिळवला.**




या स्पर्धेत निर्वाण शाह, देवेंद्र चौधरी (इयत्ता आठवी) देवांश केदारी, आराध्या सातव (इयत्ता सातवी) यांनी सहभाग घेतला होता. सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्याने शाळेचे प्रतिनिधित्व करत त्यांनी स्पर्धात्मक अशा रेस्क्यू लाइन प्रायमरी श्रेणीत एक कार्यशील रोबोट सादर केला. ज्यामध्ये कॅमेरा - आधारित लाइन, फॉलोअर सिस्टम आणि अतिरिक्त रेस्क्यू रोबोट यंत्रणा एकत्रित बसविण्यात आली होती. यासाठी शिक्षक प्रणय नेवारे व पालक सागर शाह यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968